# आजची स्त्री - आजची सावित्री

सौ. मनिषा गणेश झुरूंगे
संशोधक विद्यार्थी (पीएच.डी),
अहमदनगर कॉलेज, अहमदनगर
चलभाषः ८४०८९९४३६२, ९९२२८९०८४०
ईमेलः tgzurunge@gmail.com

आरंभापासून ते आजपर्यंतच्या कालखंडाचा विचार करता स्त्रियांचे प्रश्न संपले नाहीत. १३ व्या शतकातल्या महंदबापासून ते आजच्या २१व्या शतकापर्यंत आणि मधल्या कालप्रवाहाचा विचार केला तर शिक्षणाने थोडाफार बदल झाला असला तरी समाजाची मानसिक अवस्था बदललेली नाही. स्त्रीवादी, स्त्रीचळवळ, स्त्रीला व्यक्ती म्हणून एक माणूस म्हणून तिचे प्रश्न, व्यथा, अवस्था मांडण्याचा चांगला प्रयत्न झालाच पाहिजे. अगदी सुरूवातीचा म्हणजे लीळाचरित्रादी महानुभाव ग्रंथातून स्त्रीजीवनाचे जे चित्र दिसते. ते यातनामय असेच आहे. त्या काळातल्या समाजातही देहविक्री करणाऱ्या स्त्रियांचा वर्ग होता. त्या स्त्रियांना सामान्य स्त्रिया म्हटले जात असे.

प्राचीन काळातील स्त्रियांचे स्थान आदिम- टोळी प्रधान अशा स्वरुपाचे होते. वैदिक काळाच्या सुरूवातीला स्त्रियांना देवतेप्रयाणे पुजले जायचे. मातृसत्ताक कुटुंब पध्दती असल्याने पुरूषांना जे काही आज अधिकार आहेत. ते त्या काळात स्त्रियांना असत.मनस्मृती कालानंतर ती परिस्थिती हळूहळू बदलत गेली. स्त्री ही पुरूषांची भोगदासी आहे. एवढाच तिच्या अस्तित्वाला अर्थ जडला. याउलट बुध्दकाळात स्त्रीला दत्तक घेण्याचा हक्क , वर निवडणे या गोष्टी देखील घडल्या आहेत.

आजच्या काळातील स्त्रियांचा विचार केला तरी कोणतीही परिस्थिती बदललेली नाही. आपला समाज हा पुरूषप्रधानच आहे. त्यामुळे स्त्रियांबाबतच्या प्रश्नांना, अडचणींना, त्यांच्यावरती होत असणाऱ्या अन्यायांना वाचा फोडण्याचे काम तितकेसे केले जात नाही. समाजातील स्त्रियांबाबतचे वास्तव स्वरुप अजुनही कितीतरी ठिकाणी भयावह आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या या काळात देखील स्त्रियांविषयी तत्कालीन वास्तवविश्व कवेत घेऊन पांढरपेशा समाजात स्त्रियांवर होणारे अन्याय, पिळवणूक अजुनही दिसते. स्त्रियांबद्दलची असणारी आत्मीयता, आदरभाव, त्यांना माणूस म्हणून न्याय देणं, जगवणं या गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. एका साहित्यकृतीत कविता महाजन म्हणतात की, स्त्रीचे पाय भुतासारखे उलटे असतात. म्हणजे काही गोष्टी स्त्रियादेखील स्वतःवरती लादून घेतात. ते देखील त्यांना मान्य नाही. अशा स्त्रिया की ज्या स्वतःला एक बंधाच्या चौकटीत ठेवतात. त्या समाजातील स्त्रियांचे समाजमन, मानवी मनाची स्पंदने अलगद टिपत, भावभावनांचे कल्लोळ उरात बाळगुन स्व जागृत करणाऱ्या हृदय स्पर्शी कथा, व्यथा स्त्रियांच्या आजही पाहावयास

मिळतात.समाजातील मुख्य नैसर्गिक घटक असलेले स्त्री - पुरूष नात्याची विवंचना आजही आहे. पुरूषी अहंकाराने स्त्रियांवरती होणारे अत्याचार याचे घातक परिणाम समाजात जाणवतात. याला काही स्त्रियादेखील तितक्याच जबाबदार आहेत. स्त्री - पुरूष नाते जैविक असले तरी स्त्रियांची होणारी होरपळ आजही आपल्याला समाजात प्रकर्षाने जाणवते. याला जबाबदार हा समाजच आहे असे नाही, तर त्या स्त्रियांजवळचे असणारे समाजातील रक्षकच कसे भक्षक बनत चालले आहेत. त्यामुळे आजही आपल्या देशातच नाही, तर इतर देशातील स्त्रियांबाबतचा विचार केला तर असे लक्षात येते की, सर्वात दुर्बल आणि दुर्लक्षित घटक म्हणाल तर स्त्रिया असेच उत्तर येताना दिसते.

स्त्रियांना परंपरेने चालत असणाऱ्या गोष्टी, व्रतवैकल्य, देवपूजा, धर्मपूजा, वंश, रूढी, चालरीती, परंपरा कुळ गोत्र, जाती, वर्ण अजुनही या सर्व धर्मसंकटांमुळे तिच्या जीवनात वारंवार संकटेच येत राहिली आहे. याचे मुळ मोडून टाकण्यासाठी काही समाजसुधारक देखील पुढे आले. महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, गोपाळ गणेश आगरकर, धोंडों केशव कर्वे, या महान लोकांनी स्त्रियांना माणूस म्हणून वागवण्यासाठी अतोनात प्रयत्न केले. कृतिशील स्वरुपांची वैचारिक बैठक देखील निर्माण केली.प्रथम शिक्षणासाठी त्यांना प्रवृत्त करण्याची, तिला न्याय नाही मिळाला तर कायद्यान्वये तिला तो मिळावा. या जाणीवपूर्वक गोष्टी केल्या. या वैचारिक लढ्याने काहीशा प्रमाणात का होईना पण शिक्षणाने स्त्रियांच्यात बदल हा होऊ लागला. त्यात स्त्रीशिक्षणाच्या क्षेत्रात प्रभावीपणे काम करणाऱ्या सावित्रीबाई फुले यांचे मोलाचे कार्य आपल्याला पाहावयास मिळते. त्यांच्याही पूर्वी १८२४ साली गंगाबाई नावाच्या स्त्रीने त्यांनी मुंबईत शाळा काढली होती. पण ती थोड्या दिवसाचीच ठरली. पण सावित्रीबाईंनी तो शिक्षणाचा वसाच घेतला आणि स्त्रियांच्या जीवनात आपोआप प्रकाश जाणवू लागला. त्यांच्या या कार्याला सलामच आहे.शिक्षणाला सुरुवात झाली आणि अलैकिक असे बदल घडू लागले तरी तिला रुढी, परंपरेचे पाश होते. पण तिची खरी गरज शिक्षण हीच होती. याचे खरे श्रेय हे फुले दांपत्यालाच जाते.

आज स्त्री ही चांगलीच प्रगती करत आहे. फक्त शैक्षणिकच नाही तर जगातील असे एकही क्षेत्र नाही की, स्त्री तिथे कार्यरत नाही तर ती सर्वत्र आहे. आपल्या देशात, इतर देशात, विविध क्षेत्रांमध्ये आपल्या कर्तृत्वाची छाप पाडली. म्हणजेच तिचा प्रवास आजच्या सावित्रीपर्यंत कसा पोहोचला. स्त्री आपला मान आणि सन्मान असते. फक्त शिक्षित स्त्रिया प्रगती करु शकतात असे नाही, तर अशिक्षित स्त्रियाही आपल्या देशात, गावोगावी आहेत की, ज्यांनी आपल्या कर्तृत्वाने आपल्या देशाचे नाव उज्ज्वल केले व स्त्री जन्माचे सार्थक केले आहे. आज या स्त्रियांना आरक्षणाच्या माध्यमातून प्रत्येक क्षेत्रात आपली हक्काने जागा मिळविता येत आहे. राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, वैज्ञानिक असे कोणतेही

क्षेत्रात असो, तिने आपले स्थान मिळविण्याचा पुरेपूर प्रयत्न केला आहे. दुलारीदेवी या बिहार राज्यातील रांटी गावातील असुन त्यांना कोणत्याही प्रकारचे शिक्षण नसताना त्यांनी आपल्या चित्रकलेच्या माध्यमातून आपल्या देशाचे नाव उंचावले आहे. त्या केवळ १३ वर्षाच्या असताना विवाह, तसेच मलगा मरण पावल्यानंतर आपल्या घरी परतून त्यांनी महासुंदरी देवीच्या घरी घरकाम करताना त्यांच्याच मधुबनी चित्रकलेला प्रोत्साहन दिले. त्यांचीच प्रेरणा घेऊन त्या दोघींनी शिक्षण नसताना कलेची साधना जोपासत आपल्या मिथिला कला परंपरेला जगभर प्रसिद्ध केले. या कार्यासाठी सन २०२१ मध्ये दुलारी देवी यांना भारत सरकारने पद्मश्री पुरस्कार दिला. तसेच त्यांनी गुरु महासुंदरी देवी यांना देखील तोच पुरस्कार २०११ साली भारत सरकारने दिला होता.

होन्डुरास हा मध्य अमेरिकेतील एक देश असून त्याची राजधानी तेगुसिगल्पा आहे. होन्डुरास या देशाच्या पहिल्या राष्ट्रपती शिओमारा कॅस्ट्रो महिला म्हणून त्यांनी २८ जाने २०२२ राष्ट्रपती पदासाठी शपथ घेतली. त्याच देशाच्या उपराष्ट्रपती महिला कमला हॅरिस याही त्यावेळी उपस्थित होत्या. त्यांनी शिओमारा कॅस्ट्रो यांचे अभिनंदन करुन महिला नेतृत्व तसेच समानतेचा उल्लेखही त्यांनी केला.

निक्षार जोहर या पाकिस्तानी लष्कराच्या पहिल्या महिला लेफ्टनंट जनरल बनल्मा आहेत. त्या पाकिस्तानी लष्कराच्या पहिल्या महिला सर्जन जनरल म्हणून त्यांनी नियुक्ती करण्यात आली आहे. दक्षिण आशियातील सर्वात मोठ्या रावळपिंडी येथील आर्मी हॉस्पिटलच्या त्या प्रमुख आहेत. कोव्हिड -१९ महामारीच्या काळात त्यांनी आपली मोलाची कामगिरी बजावली होती. त्याच देशातील मलाला आपल्याला परिचित आहे. मलाला यांना नोबेल शांतता पारितोषिक १० ऑक्टोंबर २०१४ रोजी देण्यात आला. मुलींना शिक्षण मिळावे यासाठी तालिबान विरुद्धचा लढा आपल्याला विसरता येणार नाही.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्राध्यापिका शांतीश्री धुलीपुडी पंडित यांची जवाहरलाल नेहरू विद्यापीठात (जेएनयु) त कुलगुरू म्हणून सन ७ फेब्रुवारी २०२२ रोजी नियुक्ती करण्यात आली. त्या जेएनयुच्या पहिल्या महिला कुलगुरू बनण्याचा मान देखील मिळाला आहे. ही आपल्यासाठी अभिमानाची बाब आहे.

संग्या मल्ला या नेपाळ पोलीस अधिक्षक असून सध्या त्या किन्शासा कांगो येथे (Monusco) पोलीस आरोग्य आणि पर्यावरण युनिटच्या प्रमुख म्हणून काम पाहतात. कोव्हीड-१९ या महामारीत तसेच इबोला विषाणुच्या संसर्गाने कांगोच्या लोकांसाठी वैद्यकीय सहाय्यक म्हणून त्यांनी मोलाची कामगिरी पार पाडली. त्यांना २०२१ मध्ये UN वुमन पोलिस ऑफीसर ऑफ द इयर पुरस्काराने सन्मानित देखील करण्यात आले.

'मेरी कोम' या एक भारतीय बॉक्सिंगपटू आहेत. त्यांनी महिला जागतिक हौशी बॉक्सिंग अजिंक्यपद सहा वेळ जिंकले आहे. या खेळासाठी २०२० मध्ये पद्मविभूषण